# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.८/२०२५** **दिनांक ०७/१०/२०२५**
**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०७.१०.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/२७७५/२०२५ दि.०४.१०.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.**

**त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०७.१०.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.०२.०९.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिति सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४६०** **दि.०२.०९.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिति सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१.** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता, पेस्ट कंट्रोल, फॉगींग इ. दुरुस्ती देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४६१/१** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.** **(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास)**

---

**२.** **साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता, पेस्ट कंट्रोल, फॉगींग इ. दुरुस्ती देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४६१/२** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही- साई धर्मशाळा)**

---

**३.** **सन २०२६ करीता दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करुन पुरवठा करणेकामी वाणिज्यीक ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीच्या प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.४६१/३** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**४. एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरण करणे बाबत.**

**निर्णय क्र.४६१/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**५. महाराष्ट्र राज्यात पावसामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक पुर परिस्थितीमुळे आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" ला अर्थसहाय्य देणेबाबत.**

**निर्णय क्र.४६१/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३ सन २०२५-२६ करीता संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेकामी प्राप्त ई-निविदांपैकी निम्नतम L-1 निविदाधारक मे.सी.आय.एस.एस.सर्व्हिसेस, लि. मुंबई यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४६२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.४ श्री साईबाबा संस्थानमध्ये १० वर्षापासून ठेकेदारामार्फत आऊटसोर्स / ठोक पध्दतीने कार्यरत कर्मचा-यांना १० % वेतनवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.४६३ आऊटसोर्स कर्मचारी असल्यामुळे वेतनवाढ देता येत नाही. तथापी त्यांचे कामाचे मुल्यमापनाकरीता नियमावली तयार करुन प्रोत्साहनपर तरतुद करता येईल काय? याची पडताळणी करावी. शक्यतो मार्च-२०२६ पर्यंत पडताळणी पुर्ण करावी.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.५ श्री साईबाबा मंदिर नविन दर्शनरांग इमारतीचे समोर साईभक्तांचे सुविधेकरीता उभारणेत येणारे शेड व संस्थानचे सुलभ शौचालयाचे पाठीमागील वाहन पार्किंग तसेच मंदिर परिसर गेट क्र.०४ येथे तयार करावयाचे टेंसाईल फॅब्रीक शेडचे कामासाठी ठेकेदार सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबिवली यांनी कुठलीही भाववाढ/दरवाढ न देता काम पुर्ण करणेसाठी दि.३०.०९.२०२५ अखेर मुदतवाढ देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.४६४ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६ संस्थानमार्फत तयार करण्यात येणा-या बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सल्लासेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६५ प्रस्ताव मंजुर. निवड करण्यात आलेल्या पॅनलमधील ग्रुप निहाय कामाचे नियोजन करतांना अंतर्गत (डिझाईन कॉम्पीटिशन) स्पर्धा घेण्यात यावी. त्यामधुन ज्यांची डिझाईन चांगली आणि कॉस्ट इफेक्टीव्ह असेल त्यांची निवड करण्यात यावी. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७ संस्थानचे "श्री साईबाबा शैक्षणिक संकुल,शिर्डी (निमगाव को-हाळे)" चे परिसरात उभारणेत आलेल्या "श्री साईबाबा सांस्कृतिक भवन"(Auditorium Hall) वापराबाबतचे नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४६६ प्रस्ताव मंजूर. तीन महिन्यानंतर वापर शुल्काबाबत आढावा घेण्यात यावा. सदर Auditorium Hall चा वापर वाढवावा याकरीता संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८ श्री साईनाथ रुग्णालय परिसरात उभारण्यात येणा-या लॉण्ड्री व सी.एस.एस.डी. इमारतीचे दुस-या मजल्यावर रुग्णालय प्रशासकीय कार्यालय उभारणी करणेस व याकामी दुसरा मजला बांधकामासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४६७ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. (कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.९ साईआश्रम भक्तनिवास नं.१ व साई धर्मशाळा येथील कालबाह्य झालेले फायर सिलेंडर बायबॅक करुन नवीन फायर सिलेंडर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.१० श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.४६९ प्रस्ताव अ व ब मंजूर.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.११ संस्थानचे समाधी मंदिर व परिसर, कार्यालय, भक्तनिवासस्थाने, दोन्ही रुग्णालये व इतर एसी यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी निम्नतम दरधारक मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१२ श्री साई प्रसादालयातील स्टेनलेस स्टिल डायनिंग टेबल दुरुस्तीकामी निम्नतम दरधारक मे.सिध्दार्थ श्रीधर वाकचौरे, कोपरगाव यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१३ संस्थानचे वाहन विभागाकडील सर्व स्कुल व प्रवासी बसेसच्या शिटांना नवीन कुशन करणेकामी येणा-या खर्चास व याकामी दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.१४ श्री साईबाबांचे समाधी मंदिरात प्रसाद घेऊन जाणेस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७३ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.१५ "Daud for Sai" या उपक्रमातंर्गत धावण्याचा कार्यक्रम शिर्डी येथे आयोजित करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७४ झालेल्या चर्चेनुसार चक्रिय पध्दतीने फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.१६ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Liquid Medical Oxygen Gas Plant (LMO) करीता मंजूर दराने पुढील ०३ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.४७५ ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. नवीन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे ठेकेदार यांना मुदतवाढ देण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१७ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे Cold Centrifuge खरेदीकामी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४७६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१८ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे 3D CWP Video Camera With Laparoscopic set खरेदीस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७७ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.१९** **M/s Sarv Health Care Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून आकारणेत आलेल्या दंडाबाबत.**

**निर्णय क्र.४७८** **M/s Sarv Health Care Pvt.Ltd., Mumbai यांचेवर लावण्यात आलेला दंड माफ करण्यास मान्यता देण्यात आली. दंड म्हणून वसुल करण्यात आलेली रक्कम अदा करण्यात यावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील वैद्यकीय अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.४७९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२१** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.२,७०,६३३/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४८०** **प्रस्ताव मंजूर. वैद्यकीय विमा प्रस्तावावर विचार विनिमय करुन प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२२** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.९,०१,५०६/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४८१** **प्रस्ताव मंजूर. वैद्यकीय विमा प्रस्तावावर विचार विनिमय करुन प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२३** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.११,४१,१७६/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४८२** **प्रस्ताव मंजूर. वैद्यकीय विमा प्रस्तावावर विचार विनिमय करुन प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२४** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी-२०२५ ते मार्च-२०२५ कालावधीत अंर्तरुग्ण व बाहयरुग्णावर करण्यात आलेल्या रु.६,२९,८६,२१३/- वैद्यकीय उपचाराची व त्यामध्ये देण्यात आलेल्या रु.५,५८,९४,१७१/- सवलतीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४८३** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२५** **महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेतलेल्या रुग्णांच्या रिजेक्ट फाईलच्या सवलतीबाबत.**

**निर्णय क्र.४८४** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेकामी प्राप्त झालेल्या अर्जांबाबत.**

**निर्णय क्र.४८५** **चंदीगढ, आग्रा आणि दिल्ली (लोधी रोड मंदिर) येथील प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२७** **संस्थान कर्मचा-यांची विभागीय चौकशी करणेकामी शासनाचे पॅनलवरील कंत्राटी चौकशी अधिका-यांची नेमणुक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८६** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२८** **श्री.बाळासाहेब केशव सावंत, विद्युत पर्यवेक्षक, विद्युत विभाग यांनी मा.तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेल्या दि.०८.११.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४८७** **दंडात्मक कारवाईचे आदेशापुर्वी किरकोळ शिक्षा का देण्यात येऊ नये, याबाबत अर्जदार यांचे म्हणणे ऐकले नसल्याने अपील मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९** **श्री. सोमनाथ देवराम गंगावणे, वर्ग-४ कर्मचारी, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.४८८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३०** **कै.योगेश त्रिंबक साळवी, मदतनीस, लेखाशाखा विभाग यांनी जादा उपभोगलेल्या अर्जित रजेचे वेतन क्षमापीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबा संस्थान व श्री साईबाबांबद्दल होणा-या चुकीच्या अफवा, आर्थिक फसवणूक व दिशाभूल करणा-या कृत्यांवर प्रतिबंध करण्यासाठी अधिकृत धोरण व यंत्रणा राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.४९०** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३२** **श्री विरभद्र मंदिर बिरोबा बन, शिर्डी येथील श्री विरभद्र महाराज यात्रेतील कुस्ती हगामाकरीता रु.१,००,०००/-मात्र रक्कम देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९१** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३** **श्री पुण्यतिथी उत्सव-२०२५ मधील श्रींच्या फोटो व पोथीच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, फोटो, तसेच पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमासाठी मान्यवरांचे नावे निश्चितीबाबत.**

**निर्णय क्र.४९२** **अवलोकन केले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३४** **श्री साईबाबा संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे,ता.राहाता येथील जमीन गट नं.८७ व ८८ मधील सैनिक आरामगृह, शिर्डी साठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेल्या जागेत बांधकाम करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४९३** **प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३५** **आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) यांना भगवद्गगीता वितरणासाठी स्टॉल/गाळयांच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४९४** **तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री.अभिजीत देवीदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तू, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील साई प्रसादालय इमारतीतील ७२०० चौ.फुट लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेल्या जागेचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४९५** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.११४/३५, क्षेत्र ०.०८ आर श्री साईबाबा हॉस्पिटलचे दक्षिण बाजुस असलेला रस्ता रुंद करणेबाबत.**

**निर्णय क्र.४९६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३८ मौजे शिर्डी, ता.राहाता येथील सर्व्हे १९५/४ पै. व सर्व्हे १९५/५ मधील काही क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना रस्त्यासाठी कायम खरेदी देणेबाबत श्री. आबासाहेब भास्कर कोते व छबुबाई भास्कर कोते यांच्या दि.२८.०४.२०२५ रोजीच्या अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४९७ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३९ उमेद मॉल उभारणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.४९८ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४० श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम-२००४ मध्ये करावयाच्या सुधारणा/दुरुस्ती करणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.४९९ दि.२९/१०/२०२५ रोजी दुपारी १.०० वा. शिर्डी येथे स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये सदरचा विषय चर्चेसाठी ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.४१ लेखा विषयक नियमांस अनुसरुन वस्तू स्वरुपात (Fixed Asset) देणगी प्राप्त झालेल्या देणगीचे मुल्याबाबत.**

**निर्णय क्र.५०० प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.४२ दि.०१.०६.२०२५ ते दि.३१.०८.२०२५ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.५०१ धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.४३ माहे ऑगस्ट-२०२५ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५०२ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.४४ श्रींचे समाधी मंदिराचे उत्तरेकडील मुखदर्शन खिडकीवर "श्री साईबाबांचा फोटो, खिडकीची चौकट आणि ॥ ॐ साई राम ॥" असलेली सोन्याचा मुलामा/फॉईल केलेली भिंती चित्र फ्रेम तयार करुन देणगीदाखल बसविणेस परवानगी बाबत.**

**निर्णय क्र.५०३ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४५ दिल्ली येथे होणा-या 'Sai Peace Award' या कार्यक्रमासाठी आलेल्या मान्यवरांची शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी संस्थानमार्फत मोफत व्यवस्था करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०४ सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. (कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. सप्टेंबर ते डिसेंबर २०२५ करीता तातडीने गाईचे शुध्द तूप खरेदीकामी दरपत्रके मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.५०५/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

२. सप्टेंबर ते डिसेंबर २०२५ करीता तातडीने गाईचे शुध्द तूप खरेदीकामी दरपत्रकातील प्राप्त न्युनतम दरांबाबत.

**निर्णय क्र.५०५/२** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.२** पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम, क्लोरीन गॅस सिलेंडर व TCCA-90 ब्लिचींग पावडर खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.५०६** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.३** गाईचे शुध्द तुपाचे पुरवठयाबाबत.

**निर्णय क्र.५०७** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.४** श्रींचे समाधी मंदिराचे नंदीव्दार मोठा लाकडी दरवाजाचे दोन्ही बाजूस श्री.एम.आर.सोमासुंदरम, अबुधाबी यांचेकडून श्री जय-विजय यांच्या देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या ग्रेनाईटमधील मुर्ती पुर्वाभिमुख बसविणेस व त्यांना रंगकाम करणेस तसेच जय-विजय यांच्या जुन्या मुर्ती काढून घेणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५०८** प्रस्ताव मंजूर. पॉलीश करुन घेण्यात यावी, रंगकाम करु नये.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ श्री.मुस्ताक शेखलाल शेख, मदतनीस, संरक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.५०९ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.४६० ते ५०९ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.६.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**